नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मालमत्ता कर प्रणालीची घेतली माहिती

उपायुक्त सचिन पवार यांनी केले मार्गदर्शन

पिंपरी : स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक प्रभावी, पारदर्शक आणि महसूलवृद्धीस चालना देण्याच्या उद्देशाने नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने आज पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाला भेट दिली. यावेळी उपायुक्त सचिन पवार यांनी या शिष्टमंडळाला पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मालमत्ता कर प्रणालीची सविस्तर माहिती दिली.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे उपायुक्त सचिन पवार यांनी मालमत्ता कर व्यवस्थापनातील विविध प्रक्रिया, महसूलवाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच तंत्रज्ञानाधारित प्रणालींबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. डिजिटल प्रणाली, जीआयएस सर्वेक्षण आणि कार्यक्षम महसूल व्यवस्थापनाच्या माध्यमातून सेवा अधिक परिणामकारक करण्यावर आमचा भर आहे. विविध महापालिकांमध्ये अशा अभ्यासभेटी आणि अनुभवांची देवाणघेवाण झाल्यास प्रशासनातील उत्तम पद्धती एकमेकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे महसूल व्यवस्थापन अधिक सक्षम होण्याबरोबरच नागरिकांना अधिक सुलभ, विश्वासार्हता आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे शक्य होते. स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकमेकांच्या यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करणे ही सकारात्मक आणि विकासाभिमुख प्रक्रिया आहे, असेदेखील त्यांनी सांगितले.

यावेळी नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने मालमत्ता कर आकारणीची कार्यपद्धती, सर्वेक्षण व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया, लेटिंग रेट निर्धारण, महसूलवाढीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम, जनजागृती मोहिमा तसेच डिजिटल प्रणालींच्या वापराबाबत विशेष माहिती जाणून घेतली. तसेच जीआयएस आधारित सर्वेक्षण, थकबाकी वसुलीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना आणि नागरिकाभिमुख सेवा अधिक सक्षम करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यात आली.

या अभ्यासभेटीमुळे दोन्ही महापालिकांमध्ये प्रशासनातील सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण होऊन अधिक कार्यक्षम, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिकाभिमुख कर व्यवस्थापनाला चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

शेतकरी बांधवांनी डीएपी खतास पर्यायी खतांचा वापर करावा

मृदा आरोग्य व संतुलित खत व्यवस्थापनासाठी कृषी विभागाचे आवाहन

ठाणे, दि. २७ (जिल्हा परिषद, ठाणे) : राज्यात खरीप हंगामाची तयारी सुरू असून पेरणीपूर्व काळात रासायनिक खतांची मागणी वाढत आहे. विशेषतः डीएपी (Di-mmonium Phosphate) खताला मोठ्या प्रमाणात मागणी असते. मात्र राज्यात डीएपी खताचा पुरवठा अपेक्षेप्रमाणे उपलब्ध होत नसल्याने शेतकरी बांधवांनी डीएपी खतावर पूर्णपणे अवलंबून न राहता पर्यायी खतांचा वापर करावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

मागील तीन वर्षांत राज्यात खरीप हंगामादरम्यान सुमारे ४४ लाख मेट्रिक टन रासायनिक खतांचा वापर झाला असून त्यामध्ये प्रामुख्याने युरिया, डीएपी, एमओपी (म्युरेट ऑफ पोटॅश), संयुक्त खते आणि एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) खतांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य हे मृदा परीक्षण व जमीन आरोग्य पत्रिकांवर आधारित एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणालीच्या वापरात अग्रेसर राज्य मानले जाते.

डीएपी खतामध्ये १८ टक्के नत्र आणि ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्ये असतात. मात्र डीएपी खताचा पुरवठा मर्यादित असल्याने पर्यायी स्फुरदयुक्त खतांचा वापर करणे आवश्यक ठरत आहे. कृषी विभागाने एसएसपी खताचा वापर प्रभावी पर्याय म्हणून सुचविला आहे. एसएसपी हे देशांतर्गत उत्पादित खत असून त्यामध्ये १६ टक्के स्फुरदासोबत सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्येही उपलब्ध असतात. विशेषतः तेलबिया पिकांसाठी सल्फरयुक्त एसएसपी खत फायदेशीर ठरते.

कृषी विभागाच्या माहितीनुसार, डीएपीच्या एका गोणीऐवजी अर्धी गोणी युरिया आणि तीन गोण्या एसएसपी खताचा वापर हा उत्तम पर्याय ठरू शकतो. तसेच एनपीके-१०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६, एनपीके-१५:१५:१५ तसेच युरिया-एसएसपी कॉम्प्लेक्स या संयुक्त खतांच्या वापरामुळे पिकांना नत्र, स्फुरद आणि पालाश ही तिन्ही प्रमुख अन्नद्रव्ये संतुलित प्रमाणात उपलब्ध होतात.

याशिवाय टिएसपी खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्य उपलब्ध असून, डीएपीच्या एका गोणीऐवजी अर्धी गोणी युरिया व एक गोणी टिएसपी खताचा वापर केल्यास तोही डीएपीस प्रभावी पर्याय ठरतो, असे कृषी तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना मृदा परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. संतुलित खत वापरामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहण्यास मदत होते तसेच उत्पादन खर्च कमी करून पिकांचे उत्पादन वाढविण्यासही फायदा होतो.

शेतकरी बांधवांनी केवळ डीएपी खतावर अवलंबून न राहता कृषी विभागाने सुचविलेल्या पर्यायी खतांचा वापर करावा. मृदा परीक्षणाच्या आधारे संतुलित खत व्यवस्थापन केल्यास पिकांचे उत्पादन आणि जमिनीची गुणवत्ता दोन्ही टिकून राहण्यास मदत होते. खरीप हंगामात शेतकऱ्यांना आवश्यक खतांचा सुरळीत पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभाग सातत्याने कार्यरत आहे, असे कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांनी सांगितले. कृषी विभागामार्फत जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये संतुलित खत वापराबाबत जनजागृती करण्यात येत असून, अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक

ग्रामपंचायतींनी कचरा वर्गीकरण, घराघरांतून संकलन व स्थानिक स्तरावरील प्रक्रियेवर भर देण्याचे आवाहन

ठाणे, दि. २७ (जिल्हा परिषद, ठाणे) : केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयांतर्गत पेयजल व स्वच्छता विभागामार्फत ग्रामीण भागासाठी लागू करण्यात आलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हास्तरीय आढावा बैठक घेतली. १ एप्रिल, २०२६ पासून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम कायदेशीररित्या बंधनकारक करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. गावातील ओला व सुका कचरा स्थानिक स्तरावर वैज्ञानिक पद्धतीने व्यवस्थापित करून कचरामुक्त गाव ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दिली.

तसेच ग्रामपंचायतींनी प्रत्येक गावासाठी स्वतंत्र कचरा व्यवस्थापन कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश दिले. गावातील घरांमधून, दुकाने व संस्थांकडून वर्गीकृत कचरा संकलित करण्यासाठी घंटागाड्यांची व्यवस्था करणे, तसेच स्थानिक पातळीवर कंपोस्ट खत, वर्मी कंपोस्टिंग व बायोगॅस प्रकल्प उभारणीस प्राधान्य देण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड, सर्व गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग तसेच संबंधित विभागांचे अधिकारी- कर्मचारी सहभागी झाले होते.

बैठकीत घराघरांतून कचरा चार प्रकारांमध्ये वर्गीकृत करून देणे बंधनकारक असल्याबाबत जनजागृती करण्यावर विशेष भर देण्यात आला. उघड्यावर, सार्वजनिक ठिकाणी, नाल्यांमध्ये किंवा ओढ्यांमध्ये कचरा टाकणे, जाळणे किंवा पुरणे हा दंडनीय गुन्हा असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. तसेच लग्न, यात्रा, जत्रा किंवा मोठ्या कार्यक्रमांच्या आयोजकांनी तीन दिवस अगोदर ग्रामपंचायतीला माहिती देऊन कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडावी, अशा सूचनाही देण्यात आल्या.

ग्रामीण भागात घराघरांतून कचरा संकलन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन युनिट उभारणी, जुन्या कचरा डेपोचे निर्मूलन तसेच बल्क वेस्ट जनरेटर्सची नोंदणी यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. ग्रामपंचायतींनी ग्रामविकास आराखड्यात घनकचरा व्यवस्थापनाचा समावेश करून आवश्यक निधी नियोजन करावे, असेही निर्देश देण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायतींनी दरवर्षी ३० जूनपूर्वी मागील वर्षाचा कचरा व्यवस्थापन अहवाल (त्री-खत) ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य असल्याचे सांगण्यात आले. तालुकास्तरावर नागरिकांच्या तक्रार निवारणासाठी ऑनलाइन व ऑफलाइन यंत्रणा सक्रिय ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

तसेच गावातील अनौपचारिक कचरा वेचकांची अधिकृत नोंदणी करून त्यांना व्यवस्थेमध्ये समाविष्ट करण्याचे निर्देश देण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी ओल्या कचऱ्यासाठी हिरव्या व सुका कचऱ्यासाठी निळ्या रंगाच्या कचराकुंड्या उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा करण्यात आली. सरपंच, सदस्य आणि ग्रामस्थांमध्ये नियमांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी ग्रामसभा, मासिक सभा, महिला सभा घेण्याच्या सुचना तसेच बॅनर व पोस्टर लावणे, घंटागाडीद्वारे गाण्याच्या माध्यमातून जनजागृती करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

बैठकीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सर्व ग्रामपंचायतींनी नियमांचे काटेकोर पालन करून स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक गाव निर्मितीसाठी लोकसहभाग वाढवावा, असे आवाहन केले.

घनकचरा व्यवस्थापन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून ती लोकसहभागातून यशस्वी होणारी चळवळ आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने कचरा वर्गीकरण, स्थानिक स्तरावर प्रक्रिया आणि स्वच्छता व्यवस्थापनावर प्रभावीपणे काम करणे आवश्यक आहे. 'कचरामुक्त व स्वच्छ गाव' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे प्रशासन सर्व ग्रामपंचायतींसोबत समन्वयाने कार्य करत आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिकेकडून जनतेच्या जीवाशी खेळ

कंत्राटदारांच्या भल्यासाठीच मोबाईल टॉवर उभारणीचा घाट?

मुंबई / रमेश औताडे

नवी मुंबई महानगरपालिकेकडून शहरात मोठ्या प्रमाणावर मोबाईल टॉवर उभारण्याचे काम सुरू असून, स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध असतानाही प्रशासन मात्र कंत्राटदारांच्या हितासाठीच काम करत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. रहिवासी भाग, शाळा, रुग्णालये आणि गर्दीच्या परिसरात मोबाईल टॉवर उभारले जात असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र जनतेच्या आक्षेपांकडे दुर्लक्ष करत पालिका अधिकाऱ्यांनी डोळेझाक केल्याचा आरोप होत आहे.

पालिकेच्या लोकेशन कराराप्रमाणे संबंधित मोबाईल टॉवर हा सेक्टर ११ टी-जंक्शन परिसरात उभारणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात हा टॉवर सेक्टर १० मधील संत निरंकारी चौक परिसरातील मेघमल्हार सोसायटीजवळ उभारण्यात आला. या निर्णयामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आयुक्त कैलास शिंदे यांना व संबंधित अधिकाऱ्यांना रितसर पत्रव्यवहार करण्यात आला असून अद्याप कार्यवाही नाही.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, अनेक ठिकाणी मोबाईल टॉवर उभारणीपूर्वी कोणतीही सार्वजनिक सुनावणी घेण्यात आलेली नाही. रहिवाशांची परवानगी, आरोग्यविषयक अभ्यास किंवा सुरक्षेचे निकष याकडे दुर्लक्ष करून थेट परवानग्या दिल्या जात आहेत. जनतेचा जीव धोक्यात घालून मोबाईल कंपन्या आणि कंत्राटदारांना फायदा करून देण्याचा उद्योग सुरू आहे, असा संतप्त आरोप नागरिकांनी केला.

विशेष म्हणजे, मोबाईल टॉवरमधून निर्माण होणाऱ्या रेडिएशनबाबत अनेक वेळा नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींवर याचा परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत असताना पालिकेकडून मात्र कोणतीही स्पष्ट भूमिका घेतली जात नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नागरिकांनी अनेकदा लेखी तक्रारी, निवेदने आणि आंदोलनाचा इशाराही दिला असल्याचे सांगितले जाते. तरीही संबंधित विभाग आणि अधिकारी हे कंत्राटदारांच्या बाजूने उभे राहत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. जनतेच्या भावना, आरोग्य आणि सुरक्षेपेक्षा कंत्राटदारांचे आर्थिक हित महत्त्वाचे ठरत आहे का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून, मोबाईल टॉवर परवानग्यांमध्ये मोठा आर्थिक व्यवहार झाल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही म्हटले आहे. विरोध वाढत असताना नवी मुंबई महानगरपालिकेने यावर स्पष्ट भूमिका मांडावी आणि नागरिकांच्या विश्वासात घेऊनच पुढील निर्णय घ्यावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

राज्य लॉटरीच्या एप्रिल महिन्याच्या सोडतीचा निकाल जाहीर

मुंबई,दि.२७ : महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे प्रत्येक महिन्यात ५ मासिक व ६ भव्यतम सोडती तसेच साप्ताहिक सोडती काढल्या जातात. एप्रिल २०२६ मध्ये ११ एप्रिल रोजी महाराष्ट्र सह्याद्री, १५ एप्रिल रोजी महाराष्ट्र गौरव, २१ एप्रिल रोजी महाराष्ट्र गणेशलक्ष्मी वर्धापन दिन विशेष, २५ एप्रिल रोजी महाराष्ट्र तेजस्विनी व २९ एप्रिल रोजी महाराष्ट्र गजराज या मासिक सोडती काढण्यात आल्याचे उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.

एप्रिल-२०२६ मध्ये मासिक व भव्यतम सोडतीतून ९३४४ तिकिटांना रू. २६,६६,५५०/- व साप्ताहिक सोडतीतून ५२,०१५/- तिकिटांना रू. १,७१,३९,०००/- ची बक्षिसे जाहीर झाली आहेत. तसेच महा. सागरलक्ष्मी ते महाराष्ट्रलक्ष्मी या साप्ताहिक सोडतीमधून रक्कम रू. ७ लाखाची प्रथम क्रमांकाची एकूण ८ बक्षिसे जाहीर झाली आहेत.

महाराष्ट्र गणेशलक्ष्मी वर्धापन दिन या मासिक सोडतीमधून जीएस-०८/३६६० या श्री. गणेश एन्टरप्रायजेस, दादर यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.२१ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस जाहीर झाले आहे.

महाराष्ट्र गजराज या मासिक सोडतीमधून जीजे-०१/१९१४ या महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.९ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस जाहीर झाले आहे.

सर्व खरेदीदारांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या वेबसाईटवर नमूद प्रक्रिया पूर्ण करून रक्कम १०,०००/- वरील बक्षिसाची मागणी या कार्यालयाकडे सादर करावी. रक्कम रू. १०,०००/- च्या आतील बक्षिस रकमेची मागणी विक्रेत्यांकडून करण्यात यावी, असे उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी यांनी कळवले आहे.

डायनॅमिक मायक्रोस्टेपर्स लिमिटेड

CIN: L45206MH1985PLC036261

नोंदणीकृत कार्यालय: ५०६, मराठू आर्केड, ॲक्सिस बँकेच्या वर, गरवारे सुभाष रोड जवळ, विले पार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२६८४२६३१ फॅक्स क्रमांक: ०२२-२६८४२६३१
ईमेल: dynamicmicrostepperslimited@gmail.com वेबसाइट: www.dynamicmicrosteppers.com
तिमाहीसाठीच्या स्वतंत्र लेखापरीक्षित आर्थिक निकालांचा उतारा आणि ३१ मार्च २०२६ रोजी संपलेले वर्ष
आयएलआर मध्ये रक्कम

अ.क्र.	विशेष	स्टँड अलोन				
		तिमाही संपली ३१.०३.२०२६	तिमाही संपली ३१.१२.२०२५	मागील वर्षातील संबंधित ३ महिने ३१.०३.२०२५ रोजी संपले.	वर्ष संपले ३१.०३.२०२६	वर्ष संपले ३१.०३.२०२५
१	ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न	-	-	-	-	-
२	कालावधीचा निव्वळ नफा (+)/तोटा (कर आकारण्यापूर्वी, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबी)	(६६७,६२२)	(४३२,७०३)	(२५१,७३०)	(२,६९०,१६५)	(१,६४४,८५४)
३	कंरपूर्व कालावधीतील निव्वळ नफा (+)/तोटा (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर)	(६६७,६२२)	(४३२,७०३)	(२५१,७३०)	(२,६९०,१६५)	(१,६४४,८५४)
४	करानंतर कालावधीतील निव्वळ नफा (+)/तोटा (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर)	(६६७,६२२)	(४३२,७०३)	(२५१,७३०)	(२,६९०,१६५)	(१,६४४,८५४)
५	कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (ज्यात कालावधीसाठी नफा/तोटा (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) यांचा समावेश आहे	(६६७,६२२)	(४३२,७०३)	(२५१,७३०)	(२,६९०,१६५)	(१,६४४,८५४)
६	इक्विटी शेअर भांडवल	३४,४८८,०००	३४,४८८,०००	३४,४८८,०००	३४,४८८,०००	३४,४८८,०००
७	मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शवल्याप्रमाणे राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून)	-	-	-	(५०,४३६,०७०)	(४७,७४५,९०३)
८	प्रति शेअर कमाई (प्रत्येकी रु.१०/-) चालू आणि बंद केलेल्या कार्यांसाठी अ. मूलभूतः ब पातळ केलेले:	(०.१९) (०.१९)	(०.१३) (०.१३)	(०.०७) (०.०७)	(०.७८) (०.७८)	(०.४८) (०.४८)

टिपा:
१. वरील उतारा हा, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या त्रैमासिक आणि वर्ष आजपर्यंतच्या लेखापरीक्षित वित्तीय निकालांच्या तपशीलवार नमुन्याचा एक भाग आहे. त्रैमासिक आणि वर्ष-आजपर्यंतच्या लेखापरीक्षित वित्तीय निकालांचा संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर (www.bseindia.com) आणि च्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. कंपनी (www.dynamicmicerosteppers.com)
२. तुलनात्मक बनवता यावे यासाठी, आवश्यकतेनुसार मागील वर्षाच्या आकडेवारीची पुनर्रचना करण्यात आली आहे.
३. वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन करून शिफारस केली आहे आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ नुसार संचालक मंडळाने २७ मे २०२६ रोजी झालेल्या बैठकीत त्यास मान्यता दिली आहे.

ठिकाण: मुंबई
दिनांक: २७.०५.२०२६

डायनॅमिक मायक्रोस्टेपर्स लिमिटेडसाठी
सही /
अश्विन शाह
संचालक डीआयएन: ०३११५००९

MEENAKSHI STEEL INDUSTRIES LIMITED

CIN : L52110DL1985PLC020240 Regd. Office : J-189, Basement, J-Block, Saket, New Delhi-110 017,E-mail: meenakshisteelindustries@gmail.com,Website: www.meenakshisteel.in
Statement of Audited Standalone and consolidated Financial Results for the quarter and year ended 31st March, 2026

(Rs. in Lacs) Except EPS

PARTICULARS	Standalone					Consolidated				
	Quarter Ended 31.03.2026 Audited	Quarter Ended 31.12.2025 Unaudited	Quarter Ended 31.03.2025 Audited	Year Ended 31.03.2026 Audited	Year Ended 31.03.2025 Audited	Quarter Ended 31.03.2026 Audited	Quarter Ended 31.12.2025 Unaudited	Quarter Ended 31.03.2025 Audited	Year Ended 31.03.2026 Audited	Year Ended 31.03.2025 Audited
1 Total income from Operations (net)	436.88	582.20	331.12	1,902.50	1,871.16	436.88	582.20	331.12	1,902.50	1,871.16
2 Net Profit/(Loss) for the period before Tax (after Exceptional / Extraordinary items)	(73.70)	105.29	73.52	188.69	110.39	(73.70)	105.29	73.52	188.69	110.39
3 Net Profit/(loss) for the period after Tax (after Exceptional /Extraordinary item)	(53.69)	76.79	51.55	136.70	84.12	(53.69)	76.79	51.55	136.70	84.12
4 Total Comprehensive Income for the period (Comprising of Profit /(loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)	(102.19)	76.67	51.65	(240.62)	106.78	(97.54)	78.55	50.74	(234.41)	103.70
5 Equity share Capital	199.20	199.20	199.20	199.20	199.20	199.20	199.20	199.20	199.20	199.20
6 Reserves i.e. Other Equity (excluding Revaluation Reserves as shown in the Audited Balance sheet of previous years)	-	-	-	14,280.23	14,520.85	-	-	-	14,286.44	7,983.50
7 Earning per share Basic and Diluted	(2.70)	3.85	2.59	6.86	4.22	(2.46)	3.95	2.55	7.17	4.07

Notes:
1. The above is an extract of the detailed format of Quarterly / year ended Financial Results on 31.03.2026 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the audited financial results are available on the websites of the Stock Exchange (www.bseindia.com) and on the Company's website, www.meenakshisteel.in
2. These audited Standalone & Consolidated Financial Results for the quarter and year ended 31st March, 2026 have been reviewed by the Audit Committee and subsequently approved at the meeting of the Board of Directors held on 27th May, 2026.

Place:Mumbai
Date: 27th May, 2026

For MEENAKSHI STEEL INDUSTRIES LIMITED
Shivangi Murarka
(Managing Director)
DIN: 08370325

तुनी टेक्सटाईल मिल्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः युनिट नं. २०७, दुसरा मजला, इमारत नं. ३ मित्तल इंडस्ट्रियल इस्टेट, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००५९. CIN L17120MH1987PLC043996
ईमेल: info@tunitextiles.com, वेबः www.tunitextiles.com
३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठीचे लेखापरीक्षित आर्थिक निकालांचे विवरण

रु. लाखांमध्ये

अ.क्र.	विशेष	३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचे लेखापरीक्षित	३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे लेखापरीक्षित	३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरीक्षित	३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरीक्षित
१	कामकाजातून मिळणारे एकूण उत्पन्न (निव्वळ)	१,७४६.७३	१,७०५.७६	११,४८४.२६	७,६६८.७१
२	कालावधीतील निव्वळ नफा/तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	६.२२	३०.६६	१५४.२५	८०.२५
३	कर आकारण्यापूर्वीच्या कालावधीतील निव्वळ नफा/तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर)	(१५.८७)	१५.९१	९३.६६	५६.६५
४	कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न ज्यात कालावधीसाठी नफा/तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) यांचा समावेश आहे	(७.१६)	१६.१४	१०२.३७	५९.९५
५	भरणा केलेले इक्विटी शेअर भांडवल (प्रत्येकी रु. १/- दर्शनी मूल्य)	१,३०६.३१	१,३०६.३१	१,३०६.३१	१,३०६.३१
६	इतर इक्विटी	-	-	१९२.४६	७८.४६
७	प्रति शेअर उत्पन्न (असाधारण बाबींपूर्वी) प्रत्येकी रु. १/- (चालू आणि बंद केलेल्या कामकाजासाठी)				
(i)	अ) मूलभूत ब) पातळ केलेले	(०.०१२) (०.०१२)	०.०१२ ०.०१२	०.०७२ ०.०७२	०.०४३ ०.०४३

टीप:
१. वरील उतारा हा, सेबी ड्जउ्ढ रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या, ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठीच्या स्वतंत्र लेखापरीक्षित आर्थिक निकालांच्या तपशीलवार नमुन्याचा एक भाग आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठीच्या लेखापरीक्षित निकालांचा संपूर्ण नमुना कंपनीच्या www.tunitextiles या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्सचेंजच्या www.bseindia.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांकः २६ मे, २०२६

तुनी टेक्सटाईल मिल्स लिमिटेडसाठी
सही/-
नरेंद्र कृ. सुरेका
व्यवस्थापकीय संचालक